महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१/२६४७४२११

email :-ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : काऔसंवि/ब/ककनिस/५२वा बैठक/३२८८६ दिनांक : ०२/११/२०११

# परिपत्रक

विषय : कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५२ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

*************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांच्या व्यतिरिक्त काही योजनांचा नव्याने समावेश करण्याची बाब समितीच्या विचाराधीन होती.

त्यानुषंगाने, दि. ०५/१०/२०११ रोजी कर्मचारी कल्याण निधी समितीची ५२ वी बैठक प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली. सदरहू बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केल्यामुळे केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त संस्थेकडून दिले जाणारे पुरस्कार प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार मात्र) रोख पारितोषिक देण्यात यावे.

२) विविध क्षेत्रात जनहितार्थ वैज्ञानिक संशोधन करुन शोध लावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना खालील निकष परिपूर्ण करीत असल्यास त्यांना रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार मात्र) रोख पारितोषिक देण्यात यावे.

१) C.S.I.R. केंद्र शासन संघटनेद्वारा मान्यता प्राप्त किंवा
२) पेटंट मिळाले असल्यास किंवा
३) आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोध प्रबंध प्रसिध्द झाला असेल

३) M.P.S.C. / U.P.S.C. आयोगामार्फत आयोजित खुल्या स्पर्धात्मक परीक्षेत वर्ग- १ या पदासाठी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) रोख पारितोषिक देण्यात यावे.

४) मुलगी जन्मल्या नंतर कर्मचाऱ्यास प्रोत्साहनपर रु. ५,०००/- (रु. पाच हजार मात्र) या रकमेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र भेट म्हणून देण्यात यावे तसेच सदर योजना प्रचलित नियमानुसार कर्मचाऱ्यांच्या फक्त दोन पाल्यांकरिता अनुज्ञेय राहील.

५) कर्मचाऱ्याच्या मुलीने एमबीबीएस व वैद्यकीय शाखेमध्ये प्रवेश घेतल्यास प्रोत्साहनपर रु.५,०००/- (रु. पाच हजार मात्र) रोख पारितोषिक देण्यात यावे.

६) तिन्ही कंपन्यांतील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे आपसातील संबंध सुदृढ व्हावे याकरिता क.क.नि.समितीच्या वतीने प्रतिवर्षी आंतर कंपनी क्रीडास्पर्धा व नाट्यस्पर्धा खालील निकषानुसार आयोजित करण्यात येईल.

१) तिन्हीं कंपनीद्वारे प्रतिवर्षी क्रमानुसार आंतर कंपनी क्रीडास्पर्धा तसेच नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येईल. यास्तव आंतर कंपनी क्रीडास्पर्धा आयोजनाकरिता रु. ३,००,०००/- (रु. तीन लाख मात्र) व आंतर कंपनी नाट्यस्पर्धा आयोजनाकरिता रु. २,००,०००/- (रु. दोन लाख मात्र) अनुदान मंजूर करण्यात येईल.

२) आंतर कंपनीं क्रीडास्पर्धेत कबड्डी, व्हॉलीबॉल व क्रिकेट या सांघिक खेळाचा समावेश राहील.

३) आंतर कंपनी नाट्यस्पर्धेत प्रत्येक कंपनीच्या विजेत्या (कंपनी अंतर्गत नाट्यस्पर्धा घेतल्यास) किंवा कंपनीने नामांकन केलेल्या नाटकाचा समावेश राहील.

४) आंतर कंपनी क्रीडास्पर्धा तसेच नाट्यस्पर्धेचा कालावधी ०२ दिवसाचा राहील.

७) कर्मचाऱ्यांचे पाल्य ज्यांचे अपंगत्व कमीत कमी ४०% / मुकबधीर पाल्य ज्यांना जिल्हा शल्य चिकित्सकांकडून तसे प्रमाणपत्र मिळाले आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फक्त एकदा तीन चाकी सायकल / श्रवणयंत्र खरेदी करण्यासाठी रु. ५०००/- (रु. पाच हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

८) कंपनीचा कर्मचारी सेवाकाळात मयत पावल्यास त्यांच्या अवलंबितास रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी तसेच मयत पावलेल्या कर्मचाऱ्याच्या अवलंबितास सदर रक्कम रोखीने देण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयातील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी कार्यवाही करतील.

९) ज्या कर्मचाऱ्यांचे पाल्य दिल्ली येथे आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या परेड / सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतील त्यांना रु. २,०००/- (रु. दोन हजार मात्र) रोख पारितोषिक देण्यात यावे.

१०) ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील एन. सी. सी. कॅम्प, स्कॉऊट गाईड कॅम्प मध्ये सहभागी होण्यासाठी निवड होईल त्यांना सदर कॅम्पमध्ये सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

११) ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडास्पर्धेत सहभागी होण्यासाठी शासन मान्यता प्राप्त संघटनेच्या वतीने निवड झाली असेल त्यांना सदर स्पर्धेत सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

१२) कर्मचाऱ्यांचा सर्वांगीण विकास करणे तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्याकरिता तत्कालिन म.रा.वि. मंडळात स्थापन करण्यात आलेल्या क्रीडा क्लब ( Sports Club) ला पुनर्जिवित करणे तसेच नव्याने क्रीडा क्लबची स्थापना करण्यासाठी मल्टी जिम, व्यायामाचे साहित्य तसेच खेळांचे साहित्य खरेदी करण्याकरीता संबंधीत क्रीडा क्लबच्या वतीने खालील सर्व निकषांची परिपूर्तता करुन सादर केलेल्या प्रस्तावास फक्त एकदा रु. १,००,०००/- (रु. एक लाख मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

र्धेचे
रिता
रिता
श
र्गा

१) क्रीडा क्लबच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
२) कर्मचारी सदस्यांची यादी. (कमीतकमी १०० सदस्य संख्या)
३) मागील वर्षाचा लेखापरीक्षित अहवाल.
४) क्रीडा क्लब स्थापन करण्यात आलेल्या जागेचा तपशील. (स्थापत्य विभागाच्या शिफारसीसह)

१३) मान्यताप्राप्त संस्थेद्वारा आयोजित साहसी मोहिम जसे सायकल / मोटरसायकलवरुन जगप्रवास / देशभ्रमण तसेच उच्चांकन करण्यासाठी गिर्यारोहण जसे उंच शिखरे सर करणे इत्यादीसाठी निवड झालेले कर्मचारी सदर साहसी मोहिम यशस्वीरित्या पूर्ण करुन परत आल्यानंतर तसेच साहसी मोहिमेत झालेल्या खर्चाचा लेखाजोखा सादर केल्यानंतर त्यांना रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

१४) मान्यताप्राप्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन प्राविण्य ( प्रथम, द्वितिय किंवा तृतीय क्रमांक ) संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्याना खालीलप्रमाणे रोख पारितोषिक देण्यात यावे.

१) राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य रु. १०,०००/-
२) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य रु. २५,०००/-

१५) क्रीडा क्लबच्या माध्यमातून कर्मचारी व त्यांच्या परिवारासाठी नवीन वाचनालय सुरु करण्यासाठी सर राजा राममोहन रॉय लायब्ररी फाउंडेशन योजने अंतर्गत शासनाने निवडलेली पुस्तके खरेदी करण्यासाठी रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

१६) अपंग प्रौढांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धेत प्राविण्य (प्रथम, द्वितिय किंवा तृतीय क्रमांक) संपादन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रु. ५,०००/- (रु. पाच हजार मात्र) रोख पारितोषिक देण्यात यावे.

१७) कर्मचारी कल्याण निधीमधून आर्थिक मदत देण्यात येणाऱ्या आजारांच्या व्यतिरिक्त खालीलप्रमाणे आजारांचा समावेश करण्यात आला आहे.

| अ. क्र. | आजारांची नावे (तीन किंवा जास्त दिवस रुग्णालयात वास्तव्य असल्यास) | आर्थिक मदत (रु. पर्यंत) |
|---|---|---|
| 1. | Pharyngitis / Laryngitis / Tonsilitis (Operation) | Rs. 10,000/- |
| 2. | Pneumonia / LRTI (Severe) | Rs. 10,000/- |
| 3. | Monkey Bite / Dog Bite | Rs. 10,000/- |
| 4. | Anaemia | Rs. 10,000/- |
| 5. | fever – Malaria, Typhoid, Dengue | Rs. 10,000/- |
| 6. | Measles | Rs. 10,000/- |
| 7. | Polio - Paralysis | Rs. 10,000/- |
| 8. | Small Pox / Chicken Pox | Rs. 10,000/- |
| 9. | Problems of Menses / Leucorrhoea / Menopause / Frigidity | Rs. 10,000/- |
| 10. | Diabetic Gangrene | Rs. 10,000/- |
| 11. | Cholecystic | Rs. 20,000/- |
| 12. | Leptospirosis | Rs. 10,000/- |

१८) कर्मचारी कल्याण निधी समितीच्या सर्व सदस्यांना तीन वर्षातून एकदा रु. ३,०००/- (रु. तीन हजार मात्र) या रकमेची प्रवासी बॅग भेट म्हणून देण्यात यावी.

१९) भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षेच्या पूर्वतयारीसाठी राज्य शासन मान्य संस्थेत प्रशिक्षणासाठी ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची निवड झाली त्यांना रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

२०) भारतीय ऑलिम्पिक संघाशी (Indian Olympic Association) संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त संघटनेद्वारा आयोजित राष्ट्रीय खेळ (National Games), वरिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (Senior National), कनिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत (Junior National), कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी सहभागी होऊन प्राविण्य (प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक) मिळविले त्यांना मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा जसे ऐशियन गेम्स, ऑलिम्पिक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत उच्चांकन करता यावे याकरिता खेळाचा जास्तीत जास्त सराव करण्याच्या दृष्टीने त्यांच्या खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी फक्त एकदा खेळ साहित्यांच्या किमती ऐवढी किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

२१) कर्मचाऱ्यांस कायम स्वरुपी अपंगत्व आल्यास जिल्हा शल्य चिकीत्सकाच्या दाखल्याच्या आधारे त्यांना रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) आर्थिक मदत देण्यात यावी.

२२) कर्मचाऱ्यांच्या डोळयांच्या मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सदर आजार तिन्ही कंपनीने सामान्य आदेश क्र. २० (क) दि. १७/०६/१९६३ मधील विहित आजारामध्ये पुन्हा समाविष्ट केला असून प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून त्यांची अमलबजावणी करण्यात येत असल्यामुळे सदर तारखेपूर्वी कर्मचारी कल्याण निधीमधून सदर आजाराकरिता झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबत कामगार विभागाकडे प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्यात यावे.

वरीलप्रमाणे क्र. १ ते २१ योजनांच्या अंमलबजावणीचा निर्णय परिपत्रक प्रसारित झाल्याच्या तारखपासून अमलात येईल. तसेच या परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.

किशोर पवार
संदस्य / सचिव, क.क.नि.समिती तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :
१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (मा.सं.), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण.

प्रत सस्नेह :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण.
-- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:\old d drive\madhuri\SWFC\52 baithak karyavrutant.doc